कायम विना अनुदान /नुतनीकरण

जा.क्र. माध्य-३(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/२०० ६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :

25 JUL 2006

प्रति,

सचिव,

श्री.टागोर एज्युकेशन ट्रस्ट,भोसरी,
पुणे-३९

विषय : सन २००४ - २००५ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत . . .

संदर्भ : १) शासन पत्र क्रमांक : नमाशा १००३/( ४४५/२००३) माशि-१. दि. १०.५.२००३
२) शि.अ.(माध्य)जि.प. पुणे.प.क्र. जिप/शिक्षण/माध्य/ह-४/१६९/०६ दि. २९.६.०६

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून २००४ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

नुतनीकरणाने

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.टागोर एज्युकेशन ट्रस्ट भोसरी,पुणे-३९ | भोसरी,पुणे-३९ | आठवी | मराठी |

**कायम विना अनुदान**

१. आपल्या संस्थेची वरती नमूद केलेल्या नवीन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यांत आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
३. 'कायम विना अनुदान तत्वावर मिळालेली शाळा' असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा पध्दतीने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.
४. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकारी यांचेशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना 'कायम विनाअनुदानित शाळा' असा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
५. सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
६. सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
७. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावे.
८. जादा उपलब्धांत आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यांत येवू नये.
९. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यांत येवू नये...
१०. माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यांत येईल.
११. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २००३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.
१२. संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.
१३. शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन घेण्यांत येईल.
१४. माध्यमिक शाळा संहिता कलम ८६ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.
१५. शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इत्यादी बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यांत येतील.
१६. माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यकारी गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.
१७. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.